स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक 25–11–2016** रोजी **सकाळी 11–30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| अ.क्र. | मा. सदस्य/सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. बंडू उर्फ सुधीर राऊत | सभापती |
| 2. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 3. | मा. श्री. राजू भाऊराव नागूलवार | सदस्य |
| 4. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 5. | मा. श्री. जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| 6. | मा. श्रीमती संगीता कळमकर | सदस्या |
| 7. | मा. श्री. रामदास गुडधे | सदस्य |
| 8. | मा. श्री. संजय महाकाळकर | सदस्य |
| 9. | मा. श्री. सुरेश जग्यासी | सदस्य |
| 10. | मा. श्रीमती कुमूदिनी कैकाडे | सदस्या |
| 11. | मा. श्रीमती इफ्तीखर अशरफू | सदस्या |
| 12. | मा. सौ. दिव्या धुरडे | सदस्या |
| 13. | मा. श्री. गणेश उर्फ मुन्ना पोकूलवार | सदस्य |
| 14. | मा. श्री. अनिल धावडे | सदस्य |
| 15. | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. सौ. अश्विनी जिचकार | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. रामनाथ सोनवणे, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 771:–
{लोककर्म झोन 10}

प्रभाग क्र. २३ अ विविध ठिकाणी सी.सी. रोडचे बांधकाम करण्यास्तव प्राप्त निविदापैकी मे. आर्यामा इन्फ्रास्ट्रचर यांची मुळ प्राकलनीय राशी रू. ४९,९९,४१८ पेक्षा १३% ने कमी दराची रू. ४३,४९,४९४/– ( त्रेचाळीस लक्ष ऐकोनपन्नास हजार चारशे चौऱ्यानऊ रू. फक्त) ची निम्नतम प्राकलनीय दराची निविदा मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 772:–
{उद्यान विभाग}

प्रभाग क्र. 71 हिंगणा रोड अध्यापक लेआऊट प्रस्तावित उद्यानात विविध विकास कामे करण्याचे एकत्रित रु 33,31,300/– (अक्षरी तेहतीस

लक्ष एकतीस हजार तिनशे फक्त) रक्कमेच्या कामास स्थायी समिती ठराव क्र. 423/दि. 29/08/2016 अन्वये प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्या अनुषंगाने निविदा मागविल्या असता प्राप्त निविदा खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | निविदाकाराचे नाव | निविदा दर | निविदा राशी |
|---|---|---|---|---|
| 1 | विविध स्थापत्य कामे | मे. सुधाकर एस उघडे | 5.55 % कमी | रू. 11,89,842/— |
| 2 | बाबु योगा सेंटर ची निर्मिती | मे. ईंस्टीटयुट ऑफ विलेज इन्टरप्राईजेस डेव्लपमेंट फॉर हॅन्डीक्राफ्ट आर्टिसन्स (वेधा) | प्राकलनीय दर | रू. 9,96,771/— |
| 3 | हिरवळीची कामे | मे. सुधाकर एस उघडे | प्राकलनीय दर | रू. 7,54,988/— |
| 4 | खेळणी बसविणे | मे. मल्टीपल सोल्युशन | प्राकलनीय दर | रू. 3,19,700/— |
| | | | **एकूण रू :** | **रू. 32,61,301/—** |

वरील एकत्रित रू 32,61,301/— रक्कमेच्या निम्मतम निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 773:—** **{लोककर्म झोन 01}** प्रभाग क्र. 72 'क' अंतर्गत प्रज्ञा नगर व झाडे लेआउट येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. सेठ कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरानुसार असलेली रू. २९,९०,७३४/— (एकोनतीस लक्ष, नव्वद हजार, सातशे चौतीस फक्त) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 774:—** **{लोककर्म झोन 10}** प्रभाग क्र. ०७ (ब) मधील झिंगाबाई टाकळी येथे विदर्भ सोसायटी, जय दुर्गा ले आऊट, मलवार ले आऊट, बंधु नगर आणि विविध ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरण करण्यास्तव निविदा मागविल्या असता मे. एल. सी. गुरूबक्षाणी यांची मुळ प्राकलनिय दराची रू. ३४,५८,३८०/— (चौतिस लक्ष अठ्ठावन हजार तीनशे अंशी फक्त) ची निविदा मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 775:—** प्रभाग क्र. 03 (अ) हमीद नगर येथे सिंमेट कॉक्रीट रस्त्यांचे **{लोककर्म झोन 09}** कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. हितेश कंस्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 25,99,941/— पेक्षा 18.03 टक्के कमी दराची रू. 21,31,172/—(रूपये ऐकविस लक्ष ऐकतिस हजार एकशे बाहत्तर) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली. हे काम पद क्र. 679 (A42001470511) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 776:—** **{लोककर्म झोन 09}** प्रभाग क्र. 03 हमीद नगर येथे सिंमेट कॉक्रीट रस्त्यांचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. हितेश कंस्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 49,30,017/— पेक्षा 15.60 टक्के कमी दराची रू. 41,60,934/— (रूपये एकेचाळीस लक्ष साठ हजार नऊशे चौतीस) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम शासकीय अनुदान (मुलभुत सोई सुविधाचा विकास योजने) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 777:—** प्रभाग क्र. 03 (ब) अंतर्गत सरोबराबाद येथे सिंमेट कॉक्रीट **{लोककर्म झोन 09}** रस्त्यांचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. हितेश कंस्ट्रक्शन यांची मुळ

प्राकलनीय राशी रु. 49,99,995/— पेक्षा 12.12 टक्के कमी दराची रू. 43,93,995/— (रूपये त्रैचाळीस लक्ष त्र्यॅानव हजार नौवशे पंच्चावन) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्र. 681 (A2206130802) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 778:— {लोककर्म झोन 10} प्रभाग क्र. २२ ब राजभवन गेट ते फॉरेस्ट ऑफिस पर्यंत रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदा पैकी मे. आर.एम दयारामाणी यांची मूळ प्राकलनिय दराची निम्नतम निविदा रु. २८,१७,७७७/— दराची निविदा मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 779:— {लोककर्म झोन 10} प्रभाग क्र.23 अ मधील गुरुदत्त सोसायटी आणि एअरफोर्स कॉलोनी येथे रस्त्यांचे डांबरीकरण करण्यास्तव निविदा मागविल्या असता मे. एस.के. गुरुबक्षाणी यांची मूळ प्राकलनिय दराची रु. 38,36,257/— ची निविदा मंजुरी करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 780:— {लोककर्म झोन 10} प्रभाग क्र.23 अ व 23 ब मधील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करण्यास्तव निविदा मागविल्या असता मे. आर.एम. गोपलानी यांची मूळ प्राकलनिय दराची रु. 29,99,673/— ची निविदा मंजुरी करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 781:— {लोककर्म झोन 09} प्रभाग क्र. 03 (अ) गरीब नवाज नगर येथील शंभूनगर येथे सिंमेट कॉक्रीट रस्त्यांचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. हितेश कंस्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 25,99,910/— पेक्षा 18.07 टक्के कमी दराची रू. 21,30,106/— (रूपये ऐकविस लक्ष तीस हजार एकशे सहा) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्र. 679 (A42001470511) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 782:— {लोककर्म झोन 03} प्रभाग क्र. ५९ अ अंतर्गत तुकडोजीनगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण तीन निविदाकाराची निविदांपैकी मे. ओ. जी. बजाज यांची प्राक्कलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ४७,३२,१६८/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 783:— {स्लम विभाग} ''स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत'' नागपूर महानगरपालिकेमध्ये ठिकाणी नागरीकांच्या सोयीकरिता Four Wheeled Trailor Mounted Mobile Toilet Van, 10 Seater with Bio-Diagester (NGAD Technology) चे नविन सहा मोबाईल टॉयलेट पुरवठा करण्याकरीता अंदाजे रु. 69.00 लक्षचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे तसेच आय—व्यय पद क्र. A44501372305 मधून रु. 39.60 लक्षची तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 784</u>:– प्रभाग क्र. 72 'क' भांगे ले–आऊट जयताळा येथील अंतर्गत {लोककर्म झोन 01} रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. अमृता कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरानुसार असलेली रू. २९,५०,१३९/– (एकोनतीस लक्ष, पन्नास हजार, एकशे एकोनचाळीस फक्त) रकमेची सुधारित निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 785</u>:– मौजा भामटी येथील ऑरेंज सिटी रोड (लंडन स्ट्रीट) {स्थावर विभाग} येथील ८००.०० चौ. मी. जागा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या., नागपूर (MSEDCL) ला ३३ के.व्ही. उपकेंद्र उभारण्याकरीता अगावू ताबा देण्यास मंजुरी प्रदान करण्याचा तसेच MSEDCL हे शासन अंगीकृत विभाग असल्याने या विभागाला जागा देतांना महराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (जी) मधील तरतूदी नुसार बाजार भावापेक्षा कमी अधीमुल्य राशीवर देण्याचे अनुषंगाने तसेच MSEDCL हे या जागेवर जमीनीखालील भागात विद्युत केंद्र स्थापीत करणार असल्याने व जमीनीवरील जागा म.न.पा. च्या वापरात राहणार असल्याने या अनुषंगाने या प्रकरणात अधिमुल्य राशी निश्चित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी नुसार म.न.पा. सभागृहाच्या मंजूरी नंतर राज्य शासनाची मंजूरी घेणे प्रशासनास आवश्यक राहील. अधिमुल्य राशी रु. १०००/– निश्चित करण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 786</u>:– समाज कल्याण विभागा अंतर्गत लाडली लक्ष्मी योजना {समाजकल्याण विभाग} राबविण्याकरिता नियुक्त करावयाच्या एजेंसीकरीता आवेदन मागविणे व त्या अनुषंगाने आवश्यक निकष व लाभार्थी निवडावयाच्या निकषाचा प्रश्न विचारात घेणे.

समाज कल्याण विभागामार्फत लाडली लक्ष्मी योजना राबविण्याकरिता नियुक्त करावयाच्या एजेंसीकरिता E.O.I. व्दारे आवेदने मागविण्याकरिता E.O.I. तयार करण्यात आलेला असुन आवेदन कर्त्यांकरिता आवश्यक असणारे निकष तसेच या योजने अंतर्गत नियुक्त एजेंसीला करावयाची कार्य व लाडली लक्ष्मी (जिवण तरूण) योजनेचे निकष, या योजनेत समाविष्ट करावयाच्या लाभार्थ्यांचे निकष ठरविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

**उपरोक्त विषयात खालील प्रमाणे दुरुस्ती**

**१) लाडली लक्ष्मी विमा योजनेकरिता मुलीचे वय ० ते १ वर्षाच्या आतील असलेल्या मुलीला या योजनेचा फायदा घेता येईल.**

**२) आर्थिक दृष्टया गरीब असलेल्या पालकांचा मुलीला या योजनेचा लाभ घेता येतो.**

**३) म.न.पा. च्या बी.पी.एल. यादीत किंवा बी.पी.एल. रेशन कार्ड असणाऱ्यांना या योजनेत समाविष्ठ करता येईल.**

**४) ज्या पालकाला एचक अपत्य किंवा दोन्ही अपत्य मुलीच अशा मुलींना या योजनेचा लाभ घेता येईल.**

**५) नागपूर महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभागांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या लाडली लक्ष्मी योजने अंतर्गत व मुलीची पॉलीसी काढल्यानंतर** (Renewal Premium) **महानगरपालिकातर्फे दरवर्षी भरण्यात येईल.**

**६) वार्षीक विमा हप्ता भरायचा आहे त्याची रक्कम रु. ३६४५/- राहील व नंतरच्या वर्षा पासून पुढील १९ वर्ष वार्षीक हप्ता रु. ३५७९/- राहील.**

**या योजनेचे अंतर्गत मुलीच्या वयाच्या २० वर्षे पर्यंत बीमा हप्ता भरावा लागतो व पूढील पाच वर्षे प्रिमियम भरायचे नाही आहे व तसेच योजने करीत वार्षिक बीमा हप्ता रु. ३६४५/- प्रत्येकी लागेल व दुसऱ्या वर्षा पासून पुढील**

१९ वर्षे वार्षीक हप्ता रु. ३५७९/- प्रत्येकी लागेल. या योजनेद्वारे मिळणारे आर्थिक फायदे मुलीलाच मिळणार असल्यामुळे त्याचा फायदा मुलींच्या शिक्षणाकरिता व उज्वल भविष्य करिता नक्कीच फायदेशीर आहे. पॉलीसीचे फायदे पुढील खालील प्रमाणे असेल.

| | | |
|---|---|---|
| मुलींच्या वयाच्या | २० व्या वर्षी | - रु. ११,२५०/- राशी |
| | २१ व्या वर्षी | - रु. ११,२५०/- राशी |
| | २२ व्या वर्षी | - रु. ११,२५०/- राशी |
| | २३ व्या वर्षी | - रु. ११,२५०/- राशी |
| | २४ व्या वर्षी | - रु. ११,२५०/- राशी |
| | २५ व्या वर्षी | - रु. १,४२,५००/- राशी (आजच्या बोनसप्रमाणे) |

याप्रमाणे एकूण मिळणारी राशी रु. १,९८,७५०/- इतकी राहील.

७) मुलीचा मृत्यु झाल्यास भरलेली रक्कम त्या मुलीचा वारसदारास मिळेल त्या दाव्याची संपूर्ण माहिती महानगरपालिकेकडे सादर करण्याची जबाबदारी सदर एजन्सी यांची राहील.

८) २५ वर्ष पुर्ण झाल्यानंतर मॅच्युरिटीच्या पुर्ण केसेसची माहिती महानगरपालिकेकडे सादर करणे आवश्यक राहील.

९) जिवन तरुण या योजनेत ० ते १ वयापर्यंत विमा काढता येईल.

१०) संबंधीत एजेंसीला भारतीय जिवन विमा निगम मार्फत दरवर्षी लाभार्थ्यांची वर्तमान स्टेटस नुसार माहिती द्यावी लागेल.

११) लाभार्थ्यांचा पूर्णावधी दावा (Maturoty Claim) अथवा मृत्युदावा (Death Claim) झाल्यास संबंधीत एजेंसीला महानगरपालिका व भारतीय जिवन निगमचा मध्यस्थ म्हणून काम करावे लागेल.

१२) लाभार्थ्याचा कोणताही क्लेम झाल्यास त्याची संपूर्ण माहिती गोळा करण्याचे काम महानगरपालिका समाज कल्याण विभागासोबत संबंधीत एजेंसीचे देखील राहील.

१३) लाभार्थ्याला पूर्णावधी दावा अथवा मृत्युदावा झाल्यास महानगरपालिकेच्या एन.ओ.सी. शिवाय देता येणार नाही.

१४) एखादा मृत्युदावा अथवा पूर्णावधी दावा झाल्यास त्या तारखेनंतर देखील महानगरपालिका प्रिमीयम भरत असल्यास उर्वरीत व अतिरिक्त प्रिमीयम नियमाच्या व निकषाच्या अधीन राहून महानगरपालिकेला परत मिळण्याकरिता संबंधित एजेंसीलाच प्रयत्न करावा लागेल महानगरपलिका, समाज कल्याण विभाग योग्य ती मदत करेल.

१५) दरवर्षी महानगरपालिका व संबधीत एजेंसी मार्फत संयुक्तपणे पत्रव्यवहार करावा लागले. संबंधीत एजेंसीला विधानसभा क्षेत्रानुसार किंवा झोन निहाय महानगरपालिकेला बिमार्थींची लिस्ट त्यांच्या खर्चाने करुन दयावी लागेल. महानगरपालिका, समाज कल्याण विभाग हयाबाबतीत खर्च देणार नाही.

१६) विमा काढते वेळी लाभार्थ्यांना समुहाने (Group) अथवा वैयक्तीक बोलावून त्यांना ती योजना समजावून सांगण्याचे, संबंधीत योजनेबाबत फार्म भरण्याचे काम, पॉलीसी पूर्ण करण्याचे काम संबंधीत एजेंसीच्या कर्मचाऱ्यामार्फत करावे लागेल. त्याकरिता महानगरपालिका फक्त, फार्म वर अधिकारी म्हणून सही-शिक्का देण्याचेच काम करेल.

१७) दरवर्षी 'नुतनिकरण हप्ता' भरतेवेळी संपूर्ण लाभार्थ्यांची यादी तपासून, संपूर्ण विमा पॉलीसीची स्थिती महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या नमुन्या मध्ये लाभार्थ्यांकडून (आई-वडील) पालकांकडुन भरून विभागात जमा करणे आवश्यक राहील.

१८) अभिकर्ता / एजेंट शैक्षणीक दृष्टया तो सक्षम असावा जसे पदवी-पदवीधर असणे आवश्यक आहे सोबत कागद पत्रे झेरॉक्स साक्षांकीत करून जोडावी. संबंधीत लाडली लक्ष्मी योजना राबविण्याकरिता एजेंसी ला अश्या प्रकारच्या सामुहीक योजना राबविण्याचा अनुभव असणाऱ्या एजन्सीला प्राधान्य देण्यात येईल.

१९) संबंधीत लाडली लक्ष्मी योजना राबविण्याकरिता महिला एजन्सीला प्राधान्य द्यावे जेणे करुन जास्तीत जास्त मुलींचा या योजनेचा लाभ मिळेल.

२०) संबंधीत एजेंसीज करिता त्यांचे (Personal Office) वैयक्तिक ऑफिस असणे आवश्यक आहे. त्याकरिता फोटोसह माहिती देणे बंधनकारक राहील.

२१) संबंधीत एजेंसी घेण्याकरिता व एजेंसीकडे कमीत कमी २ लोकांचा कर्मचारी वर्ग असावा. माहितीसह नावासह सादर करावा.

२२) लाभार्थ्यांना सहकार्य करण्याकरिता संबंधीत एजेंसीला विशेष कर्मचारी 'लाडली लक्ष्मी' योजनेकरिता नेमावा लागेल त्याचा खर्च महानगरपालिका करणार नाही.

२३) लाभार्थ्याला अद्यावत माहिती मिळण्याकरिता त्यांचे स्वतःचे कॉम्प्युटर, लॅपटॉप व इतर ऑफिशियल साहीत्य असायला पाहिजे साधारणतः योग्य यंत्रणा असणे आवश्यक आहे.

२४) संबंधीत एजेंसीकडे कमीत कमी १००० लोकांना सेवा देणारा असावा त्याचे तितके पॉलीसीधारक असायला पाहिजे.

२५) दरवर्षी लाभार्थ्यांना पत्र पाठविणे व त्यावर लागणारा खर्च महानगरपालिका करणार नाही. तो त्यांनाच करावा लागेल.

२६) दरवर्षी लाभार्थ्यांची समुदाय संघटकामार्फत बैठकी घ्याव्या लागतील.

२७) महानगरपालिका झोन नुसार जागा उपलब्ध करून देईल.

२८) हया अगोदर चालविण्यात आलेली 'लाडली लक्ष्मी योजने' संबंधीत विविध त्रुटीचे एजेंसीला निराकारण करावे लागेल. महानगरपालिका त्याबाबतीत कोणताही खर्च देणार नाही.

२९) नवनियुक्त लाभार्थ्यांची एजेंसीला बनवून दयावी लागेल.

३०) संबंधीत 'लाडली लक्ष्मी' योजने करिता सामाजीक क्षेत्राचा संबधीत एजेंसीला अनुभव असणे आवश्यक आहे. जेणे करून लाभार्थ्याला मदत होईल.

३१) योजनेकरिता समाज कल्याण विभागासह संबंधीत एजेंसी ला पत्रकाव्दारे किंवा मौखिक प्रसिध्दी करावी लागेल.

३२) संपूर्ण लाभार्थ्यांचे बाबतीत समाज कल्याण विभागासह संपूर्ण फार्म आपणास देखील भरावे लागेल. त्याकरिता महानगरपालिका कोणताही खर्च करणार नाही.

३३) लाभार्थ्यांचा वाढदिवसाच्या दिवशी वाढ दिवसाच्या शुभेच्छापत्र महानगरपालिका व संबंधीत एजेंसी यांच्या सयुंक्त विद्यमाने पत्रकाव्दारे किंवा मॅसेजव्दारे दयावा लागेल व त्यांचा जन्म तारखेनुसार, १२ महिन्याचे वेळापत्रक संबंधीत एजेंसीने महानगरपालिकेला दयावा लागेल.

३४) लाडली लक्ष्मी योजने अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रस्तावित 'जिवन तरूण'' योजनेच्या विविध फायद्यांबाबत संबंधित संस्थेने सादरीकरण करणे बंधनकारक राहील.

३५) भविष्यात कोणताही क्लेम झाल्यास त्याकडे सर्वांगीण लक्ष देऊन नियमानुसार निपटारा करून देण्याची जबाबदारी महानगरपालिका संबंधीत एजेंसीची मध्यस्थ म्हणून भुमिका महत्वाची राहील.

वरील सूचना व दुरुस्तीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 787:— {लोककर्म झोन 09} प्रभाग क्र. 02 ब राजगृह नगर, विश्राम नगर, अंगुलीमाल नगर, रमाई नगर, कामगार नगर, कपील नगर, सुगत नगर, येथे सिंमेट कॉक्रीट रस्त्यांचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. हितेश कंस्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी रू. 29,99,558/— पेक्षा 14.00 टक्के कमी दराची रू. 25,79,620/— (रूपये पंचवीस लक्ष ऐकोणअंशी हजार सहाशे वीस) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्र. 679 (A42001470511) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 788:— {विद्युत विभाग} नेहरुनगर झोन क्र. ०५, प्रभाग क्र. ६३ मधिल आर्शिवाद नगर येथे ६/९ मी ऑक्टोगोनल खांब व एल.ई.डी. फिटिंग लावून प्रकाश व्यवस्था करण्याकरीता रु.२९,४८,०००/- ची प्राकलनीय राशीपेक्षा १.१% ने कमी असलेली रु. २७,७१,८७१/- ची निम्नतम दराची में. ॲकेलेक्ट इंजिनिअरींग, नागपूर यांच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 789:— {लोककर्म झोन 10} प्रभाग क्र. ०६ (ब) जरिपटका ५७२ ले — आऊट, बॅक कॉलनी, दयालु सोसायटी येथे WBM व रस्त्यांचे डांबरीकरण करण्यास्तव निविदा मागविल्या असता मे. आर. एम. दयारमाणी यांची मुळ प्राकलनिय दराची कामाकरीता रू. २८,०३,९३६/— (अठठाविस लक्ष तिन हजार नऊशे छत्तीस) ची निविदा मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 790:— {लोककर्म झोन 01} प्रभाग क्र. 72 'क' अंतर्गत पर्खीडे व नितनवरे ले—आउट, जयताळा येथे अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. अमृत कंन्स्ट्रक्शन कंपनी यांची वाटाघाटीनंतर प्राकलनिय दरावर रू. २८,४८,५३७/— (अठ्ठावीस लक्ष, अठ्ठेचाळ हजार, पाचशे सदतीस फक्त) रकमेची सुधारित निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा व तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 791:— {लोककर्म झोन 10} प्रभाग क्र. ६ (ब) अंतर्गत जरीपटका (जुना) येथे विविध भागात रस्त्यांचे डांबरीकरण करण्यास्तव निविदा मागविल्या असता मे. एल. सी. गुरूबक्षाणी यांची मुळ प्राकलनिय दराची रू. २५,४१,५००/— (पंचविस लक्ष एक्केचाळीस हजार पाचशे फक्त) ची निविदा मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 792:— {लोककर्म झोन 04} प्रभाग क्र. 51 ब अंतर्गत लोकमत चौक ते हम्पीयार्ड रोड बलराज या मुख्य मार्गाचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रू. 69,68,291/—रकमेच्या प्राकलनास प्र''ाासकीय मंजुरी प्रदान करून निविदा काढण्याचा व या आर्थिक वर्षात पद क्र. 370(A22001330801) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 793:— {लोककर्म झोन 10} प्रभाग क्र. ८ अ व ब मध्ये विविध ठिकाणी रोडचे डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदा मागविलेल्या असता मे. आर. एम. गोपलानी यांची मुळ प्राकलनिय दरावरील रू. २९,९९,५७१/— (एकोणतीस लक्ष नव्यानऊ हजार पांचशे एकाहत्तर रू. फक्त) ची निम्नतम प्राकलनीय दराची निविदा मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 794:–</u> प्रभाग क्र. ७ (अ) मधील जुना मानकापुर, संत ज्ञानेश्वर {लोककर्म झोन 10} सोसायटी, डोये ले आऊट, मामा ले आऊट, चेतना अपार्टमेंट समोर, गायत्रीनगर व कल्पना टॉकीज ते रेल्वे लाईन पर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करण्यास्तव निविदा मागविण्यात असता मे. ओ. जी. बजाज यांची मुळ प्राकलनिय दराची रू. ४९,९४,६३१/– (एकोणपन्नास लक्ष चौऱ्यानऊ हजार सहाशे एकतीस रू फक्त ) ची नविदा मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 795:–</u> प्रभाग क्र. ५९ अ–ब अंतर्गत चक्रधर नगर व जवाहर नगर {लोककर्म झोन 03} येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई–निविदातील प्राप्त एकूण चार निविदाकाराची निविदांपैकी मे. सेठ कन्ट्रक्शन कंपनी यांची प्राकलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. २९,९९,५९०/– रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 796:–</u> प्रभाग क्र. 04 (ब) यादवनगर स्विपर कॉलोनी येथील नाला {लोककर्म झोन 09} भिंतीचे बांधकामास्तव प्राप्त निविदापैकी मे. पटेल ऐन्ड शर्मा ईप्राटेक यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 38,43,595/– पेक्षा 15.55 टक्के कमी दराची रू. 32,45,916/–(रूपये बत्तीस लक्ष पंचेचाळीस हजार नऊशे सोळा) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्र. 618 (A43901370812) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 797:–</u> प्रभाग क्र. प्रभाग क्र. 61 ब ताजबाग परिसरात जाफर भाई {लोककर्म झोन 05} कापडेवाले नायडु ते अक्कु भाई यासिन प्लॉट आझाद भाई ते सिकंदर भाई गौसीया कॉलनी येथिल रस्त्यांचे सिमेंटीकरणाचे करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी अमित कन्स्ट्रक्शन हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 12.145 टक्के कमी दराची निविदा रूपये 23,10,687/–( रूपये तेविस लक्ष दहा हजार सहाशे सत्यांशी रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न तसच हे काम पद क्रमांक 679(A42001470511) अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 798:–</u> प्रभाग क्र. 68 'ब' मध्ये ना.सु.प्र. तर्फे हस्तांतरीत लेआउट {लोककर्म झोन 1} मध्ये विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. सेठ कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरानुसार असलेली रू. ४९,५६,५३५/– (एकोनपन्नास लक्ष, छप्पन हजार, पाचशे पसतीस फक्त) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 799:–</u> प्रभाग क्र. 68 'ब' मध्ये चिंचभवन व सोमलवाडा गावातील {लोककर्म झोन 1} रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. डी.सी. गुरूबक्षानी यांची प्राकलनिय दरानुसार असलेली रू. ४०,९५,६४८/– (चाळीस लक्ष, पंच्यान्नव हजार, सहाशे अठ्ठेचाळीस फक्त) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 800:–</u> प्रभाग क्र. 55 'अ' अंतर्गत सुरेन्द्र नगर येथील विविध ठिकाणी {लोककर्म झोन 1} रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. अमृत कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरानुसार असलेली रू. ३४,९४,५०३/– (चौतीस लक्ष,

चौऱ्यान्नव हजार, पाचशे तिन फक्त) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 801**:— प्रभाग क्र. 55 'अ' अंतर्गत एस.ई. रोड रेल्वे कॉलोनी, अत्रे लेआउट व पी. ॲण्ड टी. कॉलोनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. पी.एम.ए. कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरानुसार असलेली रू. ३४,९४,७५०/— (चौतीस लक्ष, चौऱ्यान्नव हजार, सातशे पन्नास फक्त) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
**{लोककर्म झोन 1}**

**ठराव क्रमांक 802**:— प्रभाग क्र. 68 'ब' मध्ये सोमलवाडा गावात सिमेंट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. 786 कंन्स्ट्रक्शन ॲण्ड डेकोरेशन यांची प्राकलनिय दरापेक्षा १४.००% टक्के ने कमीवर असलेली रू. २५,७९,६९८/— (पंचवीस लक्ष, एकोनअंशी हजार, सहाशे अठ्ठयान्नव फक्त) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
{लोककर्म झोन 1}

**ठराव क्रमांक 803**:— प्रभाग क्र. 68 'ब' मध्ये चिंचभवन गावात सिमेंट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. ब्रजेश मिश्रा यांची प्राकलनिय दरापेक्षा १०.१०% टक्के ने कमीवर असलेली रू. २६,९२,९५३/— (सव्वीस लक्ष, ब्यान्नव हजार, नऊशे त्रेपन्न फक्त) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
{लोककर्म झोन 1}

**ठराव क्रमांक 804** :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर